International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Reviews of Literature
ISSN 2347-2723 Impact Factor :1.4716(UIF)
Volume - 2 | Issue - 10 | May - 2015 Available online at www.lbp.world

# दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नफा क्षमतेचा चिकित्सक अभ्यास

प्राचार्य . डॉ . कंजळे . एस . आर .
मु . सा . काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर, ता . बरामती, जि . पुणे .

Short Profile

Principal. Dr. Kanjale S. R. is Working as Mu. Sa. Kakade College, Someshwar Nagar, Tal. Baramati, Dist. Pune.




## प्रस्तावना –

अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक विकासात महत्वाचा वाटा प्राप्त करून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेने भारताच्या बॅकप्रणालीमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे . बॅकांकडील उपलब्ध निधीचा वापर योग्य व कार्यक्षमपणे करून निधीचे अधिक प्रभावी व्यवस्थापन करण्याची महत्वाची जबावदारी बॅकांकडे आहे . निधीचे कार्यक्षम व्यवस्थापन करणे म्हणजे उपलब्ध साधन सामग्रीचा पर्याप्त व योग्य वापर करणे होय . जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांना त्यांच्या एकुण निधीपैकी काही रक्कम भविष्यकाळासाठी राखीव निधी म्हणुन बाजुला काढुन ठेवावी लागते व उर्वरीत निधीचा योग्य व कार्य क्षम वापर करून बॅका आपला विकास करण्याचा प्रयत्न करीत आहेत . जागतीकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या स्पर्धेच्या युगात टिकुन राहण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांना आपल्या निधीचे कार्यक्षम व्यवस्थापन करणे गरजेचे आहे .

## संशोधन विषयाची उद्दिष्टये

1 . अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या नफा क्षमतेचा अभ्यास करणे .
2 . अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या नफ्याचे योग्य व्यवस्थापन करणे .

## अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या नफा क्षमतेचे विश्लेषण

### 1 . व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण

दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या सन 2010-2011 ते 2014-2015 या मागिल पाच वर्षाच्या कालावधीतील बॅकेच्या व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणा याविषयीची माहिती कोष्टक क्रमांक 1 मध्ये दर्शविली आहे .

**कोष्टक क्रमांक 1**

**व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण**


(शेकडा प्रमाण)

| | 31-3-2011 | 31-3-2012 | 31-3-2013 | 31-3-2014 | 31-3-2015 |
|---|---|---|---|---|---|
| व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण | 7 .51 | 8 .24 | 8 .00 | 7 .89 | 7 .88 |

(स्त्रोत : दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि . वार्षिक अहवाल सन 2011 ते 2015)

**आलेख क्रमांक 1**

**व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण**




कोष्टक क्रमांक 1 व आलेख क्रमांक 1 मध्ये दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सन 2010-2011 ते 2014-2015 या आर्थिक वर्षातील व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण स्पष्ट केला आहे . यासाठी दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची गेल्या मागिल पाच वर्षातील व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणाची संक्षिप्त आकडेवारी वरील कोष्टकात दर्शवली आहे . दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणाचा संक्षिप्त अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणामध्ये सातत्याने घट झालेली पहावयास मिळतो . परंतु सन 2011-2012 मध्ये व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणामध्ये वाढ झाली आहे . सन 2012-2013 मध्ये सर्वाधिक 8 .24 टक्के व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण असुन व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण सन 2010-2011 मध्ये सर्वात कमी 7 .51 टक्के आहे .

**2 . व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण**

दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन 2010-2011 ते 2014-2015 या मागिल पाच वर्षाच्या कालावधीतील बँकेच्या व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणा विषयीची माहिती कोष्टक क्रमांक 2 मध्ये दर्शविली आहे .

**कोष्टक क्रमांक 2**

**व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण**


(शेकडा प्रमाण)

| | 31-3-2011 | 31-3-2012 | 31-3-2013 | 31-3-2014 | 31-3-2015 |
|---|---|---|---|---|---|
| व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण | 0.09 | 0.09 | 0.08 | 0.07 | 0.08 |

(स्त्रोत: दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. वार्षिक अहवाल सन 2011 ते 2015)

**आलेख क्रमांक 2**

**व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण**




कोष्टक क्रमांक 2 व आलेख क्रमांक 2 मध्ये सन 2010-2011 ते 2014-2015 या आर्थिक वर्षातील दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणाचा आढावा घेतला आहे. दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणाचा संक्षिप्त अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणामध्ये सातत्याने चढउतार झालेली पहावयास मिळतो. व्याज वसुल व्यतिरीक्त इतर उत्पन्नाचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण सर्वाधिक 0.09 टक्के असुन सर्वात कमी 0.07 टक्के आहे.

### 3. ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण

दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या सन 2010-2011 ते 2014-2015 या मागिल पाच वर्षाच्या कालावधीतील बॅंकेच्या ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणा विषयीची माहिती कोष्टक क्रमांक 3 मध्ये दर्शविली आहे.


### कोष्टक क्रमांक 3
### ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण

(शेकडा प्रमाण)

| | 31-3-2011 | 31-3-2012 | 31-3-2013 | 31-3-2014 | 31-3-2015 |
|---|---|---|---|---|---|
| ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण | 3 .51 | 3 .43 | 2 .89 | 2 .80 | 2 .70 |

(स्त्रोत: दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. वार्षिक अहवाल सन 2011 ते 2015)

### आलेख क्रमांक 3
### ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण




कोष्टक क्रमांक 3 व आलेख क्रमांक 3 मध्ये दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण स्पष्ट केला आहे. दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणाचा संक्षिप्त अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणामध्ये सातत्याने घट झालेली पहावयास मिळतो. ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाण सन 2010-2011 मध्ये सर्वाधिक 3 .51 टक्के असुन सन 2014-2015 मध्ये सर्वात कमी 2 .70 टक्के आहे.

## निष्कर्ष, सुचना व शिफारशी -

दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या व्याज वसुलीचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणामध्ये मागिल पाच वर्षात सातत्याने घट झाली असल्याने यावरून असा निष्कर्ष निघतो की, बॅंकच्या व्याज वसुलीकडे बॅंकेला अधिक कार्यक्षमपणे लक्ष देणे गरजेचे आहे, त्याचबरोबर येणे व्याजामध्ये एनपीए कर्जाच्या व्याजाचे प्रमाण जास्त असल्याने व्याज वसुलीच्या प्रमाणात वाढ घडवुन आणावयाची असल्यास एनपीए कर्जाच्या व्यवस्थापनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या ऑपरेटींग प्रॉफीटचे खेळत्या निधीशी शेकडा प्रमाणामध्ये मागिल पाच वर्षात सातत्याने घट झाली असल्याने यावरून असा निष्कर्ष निघतो की, बॅंकच्या ऑपरेटींग प्रॉफीटकडे बॅंकेला अधिक कार्यक्षमपणे लक्ष देणे गरजेचे आहे,

## संदर्भ


1 . दि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि . वार्षिक अहवाल 2010–2011 ते 2014–2015 .

2 . शेती कर्ज धोरण 2010–2011 ते 2014–2015 .


## वृत्तपत्रे


1 . दै . सकाळ – ॲग्रोवन

2 . दै . सकाळ – प्रगती

3 . दै . लोकमत

4 . दै . लोकसत्ता

5 . दै . पुढारी

6 . टाईम्स ऑफ इंडिया

7 . महाराष्ट्र टाईम्स